**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग २० ऑक्टोबर पासून सुरू होणार
## विद्यापीठाची अधिसूचना निर्गमित

अमरावती -

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दि. २० ऑक्टोबर पासून २०२१-२२ शैक्षणिक वर्षाचे महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरू करण्याची परवानगी कोव्हीड-१९ साठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व मानक कार्यप्रणाली (एस.ओ.पी.) चे पालन करुन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मॉडेल डिग्री कॉलेज तसेच स्वायत्ता प्राप्त महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी देण्यात आली असून तसा आदेश विद्यापीठाने विद्यापीठ अधिसूचना (असाधारण) क्र. **९८/२०२१, दि. १८/१०/२०२१** निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचना सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आलेली आहे.

यामध्ये महाविद्यालय सुरु करण्यापुर्वी संपुर्ण ईमारत सॅनिटाईज करुन घ्यावयाची आहे. एका तुकडीसाठी विद्यार्थ्यांची जी प्रवेश क्षमता मान्य करुन देण्यात आली आहे व त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहे, त्या क्षमतेच्या फक्त ५० टक्के विद्यार्थ्यांना एका वर्गात ऑफलाईन अद्यापनासाठी अनुमती देण्यात येत आहे. उर्वरित ५० टक्के विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्यापनासाठी व्यवस्था करावयाची आहे. कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव कमी असलेल्या क्षेत्रातील महाविद्यालये जे ५० टक्केपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे वर्ग घेवु इच्छितात, अशा महाविद्यालयांनी त्या विभागाचे शासकीय प्राधिकरणांचे पत्र सादर करावयाचे आहेत.

वयाच्या १८ वर्षापेक्षा कमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी फक्त ऑनलाईन अध्यापनाची व्यवस्था करावी, त्यांना महाविद्यालयात वर्गात आमंत्रित करु नये. ज्या विद्यार्थ्यांनी कोव्हीड-१९ च्या प्रतिबंधासाठी दोन लसी घेतलेल्या आहेत, तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर संबंधितांनी दोन लसी घेतल्या आहेत, त्यांनाच महाविद्यालयात प्रवेश देण्यात येणार आहे. अध्यापनाचे वर्गात १ डेक्स वर फक्त एकाच विद्यार्थ्याला बसविण्यात येणार असून प्रत्येकाला तोंडावर मास्क, सॅनिटायझर व अंतर राखणे, या ३ मंत्राचे पालन करणे अनिवार्य राहील, अन्यथा उल्लंघन करणाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. अध्यापनाचा वेळ ४५ मिनिटांचा व महाविद्यालय सुरु ठेवण्याचा वेळ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर निश्चित करावयाचा आहे. क्रीडा विषयक परवानगी दिली जाणार नाही. शौचालयाची साफ-सफाई व त्यांचे सॅनिटायझेशन वेळोवेळी न चूकता करण्यात यावे. वसतिगृहामध्ये एका खोलीत एक विद्यार्थी / विद्यार्थीनीची व्यवस्था तसेच वसतिगृहाची खोली मोठी असल्यास दोन विद्यार्थी / विद्यार्थीनीची व्यवस्था करण्यात येईल. वसतिगृहाची मेस मध्ये जेवणाच्या वेळा वेगवेगळ्या ठेवाव्यात, जेणेकरुन जेवतांना विद्यार्थ्यांमधील अंतर राखता येईल. वसतिगृहाचे सॅनिटाईजेशन नियमित करावयाचे असून वसतिगृहातील सर्व कर्मचाऱ्यांची दोन लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्राची नोंद ठेवावी, आदी सूचना अधिसूचनेव्दारे महाविद्यालयांना देण्यात आलेल्या आहेत.

सदर अधिसूचना विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर गॅझेट भाग-दोन मध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांनी याची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी आणि तशा सूचना आपल्या विद्यार्थ्यांना द्याव्यात आणि दि. २० ऑक्टोबर पासून नियमितपणे वर्ग सुरू करावे असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १९/१०/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी